या समवेत:- मंगळवार दिनांक- ०२ / ०९/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. प्राप्त झालेल्या अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या,स्थायी समिती सभेचे कामकाज कार्यवृत्त जोडले आहे.

---

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग
क्र.साप्रवि-१/परिषद/स्थायी सभा/ 482 /२०२५
अहिल्यानगर, दिनांक 24/09 /२०२५

प्रत माहितीसाठी सादर,

१. मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर
२. मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, अहिल्यानगर
३. मा.प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, अहिल्यानगर
४. खाते प्रमुख सर्व

२/-आपल्या खात्यासंबंधी विषय व त्याबाबतचे ठरावासंबंधी, तसेच सभेमध्ये झालेल्या चर्चेत उपस्थित केलेल्या प्रत्येक मुददयावर उचित कार्यवाही करुन त्याचा अनुपालनचा लेखी अहवाल सामान्य प्रशासन विभागास त्वरीत पाठवावा,म्हणजे पुढील स्थायी समिती सभेस अनुपालन सादर करता येईल.

(राहुल शेळके)
सचिव,स्थायी समिती सभा तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी,(सा.)
जिल्हा परिषद, अहिल्यानगर

स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक ०२/०९/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. सभेचे कार्यवृत्त

हजर अधिकारी

| अ.क्र. | नाव | अ.क्र | नाव |
|---|---|---|---|
| १ | मा.श्री आनंद भंडारी<br>प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी | २ | मा.विजय मुळीक<br>अति.मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ३ | श्री.राहुल शेळके सचिव स्थायी समिती<br>तथा,उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) | ४ | श्री.शैलेश मोरे<br>मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| ५ | श्री दादाभाऊ गुंजाळ<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(ग्रा.पं.) | ६ | श्री.राजेंद्र देसले<br>प्रकल्प संचालक जलजीवन मिशन |
| ७ | (श्री महादेव जायभाये)प्रतिनीधी संजय कदम<br>प्रभारी जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबाक) | ८ | श्री सागर चौधरी<br>कार्यकारी अभियंता (सा.बां.दक्षिण) |
| ९ | श्री.बाळासाहेब ननवरे<br>कार्यकारी अभियंता (सा.बां.उत्तर) | १० | श्री.दिलीप सोनकुसळे<br>प्र.उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो) |
| ११ | श्री.डपकर शिवम<br>प्रभारी जिल्हा जलसंधारण अधिकारी (ल.पा) | १२ | श्री एच.बी.चव्हाण<br>कार्यकारी अभियंता,(ग्रा.पा.पु.) |
| १३ | श्री सुधीर शिंदे<br>कृषि विकास अधिकारी | १४ | डॉ.श्री दशरथ दिघे<br>जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अहिल्यानगर |
| १५ | डॉ.श्री बापूसाहेब नागरगोजे<br>जिल्हा आरोग्य अधिकारी | १६ | श्री.भास्कर पाटील<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) |
| १७ | श्रीम संध्या गायकवाड<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक) | १८ | श्री देविदास कोकाटे<br>जिल्हा समाज कल्याण अधिकारी |
| १९ | श्री बाबासाहेब घोरपडे<br>उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी | २० | श्री. निखिल पठारे<br>प्र.उप अभियंता (भु.स.वि.यो.) |
| २१ | श्री बाळासाहेब बुगे<br>शिक्षणाधिकारी (योजना) | | |

**विषय क्रमांक १:**- दि. ०४/०८/२०२५ रोजीची स्थायी सभा पुर्ण झालेल्या सभेचे इतिवृत वाचुन कायम करणे .

**ठराव क्र १६३-** दि .०४/०८/२०२५ रोजी दुपारी १.०० वा.पुर्ण झालेल्या सभेचे इतिवृत कायम करणे व संबंधित खात्याने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणेत येऊन त्यावर महत्त्वाचे कार्यवाहीच्या मुद्यावर संबंधित विभागाने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेऊन त्यांची नोंद घेणेत

आली.संबंधित सर्व खातेप्रमुखांनी सभेतील कामकाजानुसार तातडीने उचित कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे.

**विषय क्रमांक २–** ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडेस तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या असल्याने अर्थ विभागाने व्यपगत केलेल्या सुरक्षा अनामत रक्कम परत करण्याबाबत

प्रस्तावना:-- ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद अहिल्यानगर सोबत जोडलेल्या यादी प्रमाणे तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या पुर्ण कामाचे अर्थ खात्याने व्यपगत केलेल्या सुरक्षा अनामत रक्कम ६६६८१/- परत मिळण्याबाबत संबधित ठेकेदार यांनी मागणी केलेली आहे सदर रकमा व्यपगत केलेल्या रकमेचा परता मंजुरीचे अधिकार स्थायी समितीचे असुन सदरची बाबत मा.जि.प.पं.स लेखासंहिता १९६८ चे नियम क्र.२१९ अन्वये जिल्हा परिषद स्थायी समितीच्या सभेपुढे ठेवणे आवश्यक आहे त्याअनुसार सदर व्यपगत झालेल्या रक्कमा संबधितांस परत करणे बाबत मंजुरीस विचार करणे

| .अ क्र | कामाचे नांव | एजन्सीचे नांव | रक्कम | वसुल रक्कम | प्रमाणक दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | राष्ट्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजना मौजे पठारवाडी ता कर्जत जि अनगर. | अनिल गोविंद सुपेकर | १४७५१/- | ०००. | १ - दि.०३/०३/२०२० |
| २ | राष्ट्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजना मौजे पठारवाडी ता कर्जत जि अनगर. | | ३२६४/- | ०००. | /४९ - दि.०७/०३/२०२० |
| ३ | राष्ट्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजना मौजे पठारवाडी ता कर्जत जि अनगर. | | १५७४३/- | ०००. | ५७ - दि.१४/०७/२०२० |
| ४ | राष्ट्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजना मौजे बारडगांव सुद्रिक ता कर्जत जि अनगर. | | १५०९२/- | ०००. | ६८ - दि.१०/०८/२०२० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | मुख्यमंत्री ग्रामीण पाणी पुरवठा योजना मौजे धालवडी ता कर्जत जि अनगर. | | १७८३१/- | ०००. | १०५ - दि.२१/०१/२०२० |
| एकुण रक्कम | | | ६६६८१/-/ | | |
| अक्षरी रक्कम रुपये:-- सहासष्ठ हजार सहाशे ऐक्याऐंशी रु मात्र | | | | | |

**नियमाची तरतुद**:-- महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ नियम क्र.२१९
विभागाचे अभिप्राय:-- जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडील तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या पुर्ण कामाच्या अर्थ खात्याने व्यपगत केलेल्य रक्कमा ठेकेदारास परत करावयाच्या असल्याने स्थायी समिती सभेची मान्यता आवश्यक आहे.

**ठराव क्रमांक १६४**- ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद अहिल्यानगर सोबत जोडलेल्या यादी प्रमाणे तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या पुर्ण कामाचे अर्थ खात्याने व्यपगत केलेल्या सुरक्षा अनामत रक्कम ६६६८१/- परत मिळण्याबाबत संबधित ठेकेदार यांनी मागणी केलेली आहे सदर रकमा व्यपगत केलेल्या रकमेचा परता मंजुरीचे अधिकार स्थायी समितीचे असुन सदरची बाबत मा.जि.प.पं.स लेखासंहिता १९६८ चे नियम क्र.२१९ अन्वये जिल्हा परिषद स्थायी समितीच्या सभेपुढे ठेवणे आवश्यक आहे त्याअनुसार सदर व्यपगत झालेल्या रक्कमा संबधितांस परत करणे बाबत मंजुरीस विचार करणे

| .अ क्र | कामाचे नांव | एजन्सीचे नांव | रक्कम | वसुल रक्कम | प्रमाणक दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | राष्ट्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजना मौजे पठारवाडी ता कर्जत जि अनगर. | अनिल गोविंद सुपेकर | १४७५१--/ | ०००. | १- दि.०३/०३/२०२० |
| २ | राष्ट्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजना मौजे पठारवाडी ता कर्जत जि अनगर. | | ३२६४-- | ०००. | ४९- ०७/०३/२०२०दि |
| ३ | राष्ट्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजना मौजे पठारवाडी ता | | १५७४३/- | ०००. | ५७ - दि.१४/०७/२०२० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | कर्जत जि अनगर. | | | | |
| ४ | राष्ट्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजना मौजे बारडगांव सुद्रिक ता कर्जत जि अनगर. | | १५०९२/- | ०००. | ६८ - दि.१०/०८/२०२० |
| ५ | मुख्यमंत्री ग्रामीण पाणी पुरवठा योजना मौजे धालवडी ता कर्जत जि अनगर. | | १७८३१/- | ०००. | १०५ — दि.२१/०१/२०२० |
| एकुण रक्कम | | | ६६६८१/- | | |
| अक्षरी रक्कम रुपये:-- सहासष्ठ हजार सहाशे ऐक्याऐंशी रु मात्र | | | | | |

**नियमाची तरतुद**:-- महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ नियम क्र.२१९ अन्वये वरील ५ कांमाच्या सुरक्षा अनामत रक्कमेस परत करणेस या ठरावान्वये मान्यता देत आहे.

**विषय क्रमांक ३**– ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडेस तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या असल्याने अर्थ विभागाने व्यपगत केलेल्या सुरक्षा अनामत रक्कम परत करण्याबाबत

प्रस्तावना:-- ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद अहिल्यानगर सोबत जोडलेल्या यादी प्रमाणे तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या पुर्ण कामाचे अर्थ खात्याने व्यपगत केलेल्या सुरक्षा अनामत रक्कम १४४६१४/- परत मिळण्याबाबत संबधित ठेकेदार यांनी मागणी केलेली आहे सदर रकमा व्यपगत केलेल्या रकमेचा परता मंजुरीचे अधिकार स्थायी समितीचे असुन सदरची बाबत मा.जि.प.पं.स लेखासंहिता १९६८ चे नियम क्र.२१९ अन्वये जिल्हा परिषद स्थायी समितीच्या सभेपुढे ठेवणे आवश्यक आहे त्याअनुसार सदर व्यपगत झालेल्या रक्कमा संबधितांस परत करणे बाबत मंजुरीस विचार करणे

| .अ क्र | कामाचे नांव | एजन्सीचे नांव | रक्कम | वसुल रक्कम | प्रमाणक दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | राष्ट्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजना मौजे पोखर्डी ता जि | मेआर .एस. न क्शकनस्ट्र | ७२८५० | ०००. | ३२ – ०६/०९/२०१९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | अनगर. | नगर.अ | | | |
| २ | राष्ट्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजना मौजे पोखर्डी ता जि अनगर. | | ३०४१० | ०००. | ३१ – ०६/१२/२०१९ |
| ३ | राष्ट्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजना मौजे पोखर्डी ता जि अनगर. | | ४१३५४ | ०००. | ३१ – २३/१०/२०२० |
| एकुण रक्कम | | | १४४६१४-/ | | |
| अक्षरी रक्कम रुपयेः-- एक लक्ष चव्वेचाळीस हजार सहाशे चौदा रु मात्र | | | | | |

**नियमाची तरतुद**:-- महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ नियम क्र.२१९

**विभागाचे अभिप्राय**:-- जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडील तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या पुर्ण कामाच्या अर्थ खात्याने व्यपगत केलेल्य रक्कमा ठेकेदारास परत करावयाच्या असल्याने स्थायी समिती सभेची मान्यता आवश्यक आहे.

**ठराव क्रमांक १६५**- ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद अहिल्यानगर सोबत जोडलेल्या यादी प्रमाणे तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या पुर्ण कामाचे अर्थ खात्याने व्यपगत केलेल्या सुरक्षा अनामत रक्कम १४४६१४/-- परत मिळण्याबाबत संबधित ठेकेदार यांनी मागणी केलेली आहे सदर रकमा व्यपगत केलेल्या रकमेचा परता मंजुरीचे अधिकार स्थायी समितीचे असुन सदरची बाबत मा.जि.प.पं.स लेखासंहिता १९६८ चे नियम क्र.२१९ अन्वये जिल्हा परिषद स्थायी समितीच्या सभेपुढे ठेवणे आवश्यक आहे त्याअनुसार सदर व्यपगत झालेल्या रक्कमा संबधितांस परत करणे बाबत मंजुरीस विचार करणे

| .अ क्र | कामाचे नांव | एजन्सीचे नांव | रक्कम | वसुल रक्कम | प्रमाणक दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | राष्ट्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजना मौजे पोखर्डी ता जि | मेआर .एस. न क्शकनस्ट्र | ७२८५० | ०००. | ३२ - ०६/०९/२०१९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | अनगर. | नगर.अ | | | |
| २ | राष्ट्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजना मौजे पोखर्डी ता जि अनगर. | | ३०४१० | ०००. | ३१ - ०६/१२/२०१९ |
| ३ | राष्ट्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजना मौजे पोखर्डी ता जि अनगर. | | ४१३५४ | ०००. | ३१ - २३/१०/२०२० |
| एकुण रक्कम | | | १४४६१४/- | | |
| अक्षरी रक्कम रुपये:-- एक लक्ष चव्वेचाळीस हजार सहाशे चौदा रु मात्र | | | | | |

**नियमाची तरतुद**:- महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ नियम क्र.२१९ अन्वये वरील ३ कांमाच्या सुरक्षा अनामत रक्कमेस परत करणेस या ठरावान्वये मान्यता देत आहे.

**विषय क्रमांक ४**- जिल्हा परिषद अधिनिस्त असलेली निरुपयोगी मोटार वाहने / यंत्र सामुग्रीचे लिलाव समितीने
शिफारस /मान्यता तसेच फेरमुल्यांकन केलेल्या निरुपयोगी मोटार वाहने व यंत्र सामुग्री यांच्या ई - निविदेद्वारे निर्लेखनास स्थायी
समिती सभेपुढे ठेवावयाचा विषय.

जिल्हा परिषद अहिल्यानगर अहिल्यानगर च्या अधिनिस्त असलेल्या विविध विभागाकडील निर्लेखनास पात्र जुनी निरुपयोगी मोटार वाहने / यंत्रसामुग्री च्या निर्लेखन प्रस्तावास मान्यता देण्यासाठी त्याचप्रमाणे नव्याने निर्लेखन करणेसाठी जमा झालेली मोटार वाहने व यंत्रसामुग्री लिलाव समितीने शिफारस / मान्यता घेण्यासाठी शासन निर्णय क्र. जेईपी-१०९६ / सी.आर -३५८८ / २६ मंत्रालय, मुंबई दिनांक २२ नोव्हेंबर २००० नुसार सुचीत केलेप्रमाणे गठीत करण्यात आलेल्या लिलाव समितीची बैठक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.अ.नगर यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १२/०८/२०२५ रोजी दुपारी ०१.०० वाजता मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दालन, जिल्हा परिषद, अ.नगर येथे घेण्यात आली. बैठकीमध्ये जिल्हा परिषदेच्या अधिनस्त असलेल्या विविध विभागाकडील निरुपयोगी मोटार वाहने / यंत्रसामुग्री लिलावाने विकी करुन निकाली काढण्यासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावाबाबत विषयानुरुप चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले.

निवीदेस प्रतिसादा अभावी लिलाव न झाल्यामुळे खालील प्रपत्रामध्ये नमुद सुधारीत वाजवी किंमत ही वाहनाचे सद्यस्थितीचे अवलोकन करता सदर वाहने विनावापर एकाच जागेवर ब-याच दिवसांपासुन उभी असल्याने अत्यंत खराब झाली असुन त्याप्रमाणे वाहन घेणा-याला वाहनांवर वस्तु व सेवा कर (जी.एस.टी) तसेच आर.टी.ओ. टॅक्स जास्ती प्रमाणात भरावा लागत असल्याने वाहनास अपेक्षित किंमतीसह घेण्यास लिलावधारकांचा प्रतिसाद मिळत नाही.

१) जिल्हा परिषदेकडील १५ वर्षे पुर्ण झालेल्या वाहनांचे एम.एस.टी.सी., धातु भंगार व्यापार महामंडळ यांच्यामार्फत निष्कासन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन गृह विभाग (परिवहन), शासन निर्णय क्र. एम.व्ही.आर - ०५२२/ प्र.क्र. ४१/ परि-२/ मंत्रालय, मुंबई दि. १४ नोव्हेंबर २०२४ नुसार वाहने नोंदणी दिनांकापासून सदर शासन निर्णयाच्या दिनांका पर्यंत १५ वर्षे किंवा १५ वर्षांपेक्षा जास्त वय असणारी राज्य शासनाच्या मालकीची वाहने एम.एस.टी.सी मार्फत निष्कासित (स्क्रॅप) करणे आवश्यक आहे. असे कळवले आहे. आणि त्या त्या विभागातील उपपरिवहन अधिकारी यांना सुचीत करुन ज्या ज्या शासकीय विभागातील वाहनांचे आयुर्मान १५ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वय झाले आहे ते तात्काळ निष्कासीत करावे असा आदेश दिलेला आहे.

तसेच अप्पर परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र क्र. एमव्हीआर-१११८/सीआर-४६४ ए / का.२ (३)/ जा.क्र. ५६९२/ दि. १४ मे २०२४ नुसार १५ वर्षे पुर्ण झालेली (वाहनाचे आयुर्मान संपलेलेली / नोंदणी कार्यकाळ संपलेली) शासकीय वाहने इथुन पुढे वापरता येणार नाही. अशी वाहने रस्त्यावर दिसल्यास त्यावाहनांवर तसेच नोंदणीकृत प्राधिका-यांवर कारवाई करण्यात येणार आहे. अशी सर्व वाहने तात्काळ परिवहन आयुक्त (महाराष्ट्र राज्य) यांचे मान्यतेने मेटल स्क्रॅप ट्रेड कॉर्पोरेशन (एम.एस.टी.सी.) मुंबई यांच्याकडून सेलर लॉगीन आय.डी. प्राप्त करुन आपल्या स्तरावरुन वाहने एम.एस.टी.सी. यांच्या संकेतस्थळामार्फत ई - लिलाव करण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला. त्याचे किंमत प्रादेशीक परिवहन कार्यालय ठरवते. त्यानुसार सेलर लॉगीन नोंदणी प्रक्रिया करुन संबंधीत विभाग / कार्यालय यांनी फक्त त्यांच्या स्वखर्चाने खरेदी केलेल्या वाहनांचेच लिलाव प्रक्रिया करावे. असे कळवले आहे. त्यानुसार मेटल स्क्रॅप ट्रेड कार्पोरेशन (एम.एस.टी.सी.) मुंबई यांच्याकडून सेलर लॉगीन आय.डी. प्राप्त करुन घेणे साठी जिल्हा परिषदेचा मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नांवे वाहनांची नोंदणी असल्यामुळे त्यांचे नांवाने सेलर लॉगीन आय.डी. प्राप्त करुन घेणे तसेच पोर्टलवर १५ वर्षे किंवा १५ वर्षांपेक्षा जास्त वय असणारी सर्व वाहने एम.एस.टी.सी. पोर्टलवरुन स्क्रॅप म्हणुन निष्कासित करणेबाबतचा निर्णय लिलावसमिती मार्फत घेण्यात आला आहे. त्याला समितीची मान्यतेस्तव सादर.

२) भुजल सर्व्हेक्षण विकास व यंत्रणा, नाशिक यांचेकडील वाहन स्पार-१० हे तांत्रिक कारणास्तव रद्य करुन मुळ विभागामार्फत एमएसटीसी पोर्टलवर निर्लेखन करणेबाबत कळविणे तसेच लिलावदाराला ईसारा रक्कम परत करणे

श्री शिवाजी बाळासाहेब लोंढे, अहिल्यानगर यांनी लिलावात स्पार १० युनिट, रिग मशीन एम एच १२ एफ ८२८७ (टेंडर आय.डी. ९३१२३० ) चे १५ वर्षे पुर्ण झालेने लिलावधारकास वाहन ताब्यात न देता प्रादेशीक परिवहन अधिकारी यांचे सुचनेनुसार ते वाहन मुळ विभागाकडून एम.एस.टी.सी. पोर्टलवर नोंदवून निकाली काढण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. तसेच ईसारा रक्कम परत करणेचा निर्णय घेण्यात आला. मा. प्रशासक यांचेसमोर मान्यतेस्तव सादर.

३) नव्याने प्रस्तावीत झालेली यंत्रसामुग्री सक्षम प्राधिकारी यांचेकडे शिफारस करणेसाठी (प्रपत्र - अ) / नव्याने सक्षम प्राधिका-यांचे शिफारस मिळालेल्या वाहनांच्या निर्लेखनास मान्यता देणे. (प्रपत्र - ब)

प्रपत्र अ नुसार वाहन क्र. एम.एच.१६ एन ०३५० हे वाहन कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा विभाग, जि.प. अहिल्यानगर यांचे नांवाने नोंदणी झालेली आहे व सदया ते वाहन उपअभियंता यांत्रिकी, यांत्रिकी उपविभाग, यांचे कार्यालयात वापरात होते ते निर्लेखन करणेकामी जमा केले आहे. या वाहनाचा मा. प्रादेशीक परिवहन कार्यालय यांचेकडील वाहनांची नोंदणीचा १५ वर्षांचा कार्यकाळ संपलेला असुन सदरच्या वाहनाचा प्रादेशीक परिवहन कार्यालयामार्फत आर.सी. बुक (नोंदणी) कॅन्सल झालेली आहे. त्यामुळे सदरचे वाहन महाराष्ट्र शासन गृह विभाग (परिवहन), शासन निर्णय क्र. एम.व्ही.आर - ०५२२/ प्र.क्र. ४१/ परि-२/ मंत्रालय, मुंबई दि. १४ नोव्हेंबर २०२४ नुसार वाहने नोंदणी दिनांकापासून सदर शासन निर्णयाच्या दिनांका पर्यंत १५ वर्षे किंवा १५ वर्षांपेक्षा जास्त वय असणारी राज्य शासनाच्या मालकीची वाहने एम.एस.टी.सी मार्फत निष्कासित (स्क्रॅप) करणे आवश्यक आहे. असे कळवले आहे.

तसेच वाहन क्र. एम.एच.१६ एन ०५७७ व वाहन क्र. एम.एच.१६ एन ०५८२ हे वाहन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नांवाने नोंदणी झालेली आहे. ही वाहने अनुक्रमे पंचायत समिती जामखेड आणि पंचायत समिती संगमनेर यांचे कार्यालयाकडे वापरात आहेत. या वाहनांना शासन निर्णय क्र. क्रं.वि.अ.प्र.-२०१३/प्र.क्र.३० /२०१३/ विनियम भाग-२/मंत्रालय, मुंबई दि. १७ एप्रिल २०१५ मधील अ.क्र.५७ पुस्तिकेतील अ.क्र.१६-क/नियम क्र.६९ पान क्र. ४०-४१ नुसार शासकीय वाहनाची धावसंख्या २.४० लक्ष व आयुर्मान १० वर्षे पुर्ण झालेनंतरच वाहन निर्लेखनास पात्र होते त्यानुसार वाहन निर्लेखनास पात्र. ही वाहने सक्षम प्राधिकारी यांची शिफारस घेऊन पुढील कार्यवाही करणेचा निर्णय घेण्यात आला. सदरच्या पोर्टलवर सेलर लॉगीन नोंदणी करुन विक्री करणेसाठी मा. प्रशासक यांचेसमोर मान्यतेस्तव सादर.

नव्याने प्रस्तावीत झालेली यंत्रसामुग्री सक्षम प्राधिकारी यांचेकडे शिफारस करणेसाठी

(प्रपत्र - अ)

| अ क्र | यंत्र सामुग्री / मोटार वाहन | वाहनांचा क्रमांक /तपशिल | नोंदणी धारकाचे नांव | सद्यस्थिती | प्रस्तावित वाजवी किमत रुपये | सक्षम अधिकारी | लिलाव समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | महिंद्रा अँड महिंद्रा डिझेल जीप बोलेरो | एम. एच. १६ एन ०३५० | मा. का.अ. ग्रापापु, जि.प. अ.नगर | सद्यस्थितीत या वाहनाला १५ वर्षे पुर्ण होऊन वाहनाचा उपप्रादेशीक परिवहन कार्यालयाकडील १५ वर्षाचा कार्यकाळ संपला असुन नोंदणीची मुदत संपलेली आहे.<br>महाराष्ट्र शासन गृह विभाग (परिवहन), शासन निर्णय क्र. एम.व्ही.आर - ०५२२/ प्र.क्र. ४१/ परि-२/ मंत्रालय, मुंबई दि. १४ नोव्हेंबर २०२४ नुसार वाहने नोंदणी दिनांकापासून सदर शासन निर्णयाच्या दिनांका पर्यंत १५ वर्षे किंवा १५ वर्षांपेक्षा जास्त वय असणारी राज्य शासनाच्या मालकीची वाहने एम.एस.टी.सी मार्फत निष्कासित (स्क्रॅप) करणे आवश्यक आहे. असे कळवले आहे. | किंमतीचे अधिकार प्रादेशीक परिवहन अधिकारी कार्यालया मार्फत ठरवले जाते. | मा. स्थायी समिती विभाग, जि.प. अहिल्या नगर | सक्षम प्राधिकारी यांची शिफारस घेऊन जाहीर ई § निविदे द्वारे लिलावाची कार्यवाही करणेत यावे |
| २ | महिंद्रा अँड महिंद्रा डिझेल जीप बोलेरो | एम. एच. १६ एन ०५७७ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अहिल्या नगर | शासन निर्णय क्र. क्रं.वि.अ.प्र.-२०१३/प्र.क्र.३० /२०१३/ विनियम भाग-२/मंत्रालय, मुंबई दि. १७ एप्रिल २०१५ मधील अ.क्र.५७ पुस्तिकेतील अ.क्र.१६-क/नियम क्र.६९ पान क्र. ४०-४१ नुसार शासकीय वाहनाची धावसंख्या २.४० लक्ष व आयुर्मान १० वर्षे पुर्ण झालेनंतरच वाहन निर्लेखनास पात्र होते त्यानुसार वाहन निर्लेखनास पात्र. | १६५०००/- | मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक | |
| ३ | महिंद्रा अँड महिंद्रा डिझेल | एम. एच. १६ एन | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. | शासन निर्णय क्र. क्रं.वि.अ.प्र.-२०१३/प्र.क्र.३० /२०१३/ विनियम भाग-२/मंत्रालय, मुंबई दि. १७ एप्रिल २०१५ मधील अ.क्र.५७ पुस्तिकेतील अ.क्र.१६-क/नियम क्र.६९ | १६५०००/- | मा. विभागीय आयुक्त, नाशिक | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | जीप बोलेरो | ०५८२ | अहिल्या नगर | पान क्र. ४०-४१ नुसार शासकीय वाहनाची धावसंख्या २.४० लक्ष व आयुर्मान १० वर्षे पुर्ण झालेनंतरच वाहन निर्लेखनास पात्र होते त्यानुसार वाहन निर्लेखनास पात्र. | | विभाग नाशिक | |
| ४ | | एम. एच. १६ एन ०५८९ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अहिल्या नगर | | १६५०००/- | मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक | |

**वर नमूद तक्ता** प्रपत्र क्रमांक अ **मध्ये नमूद यंत्रसामुग्री सक्षम प्राधिकारी यांची शिफारस घेऊन निर्लेखन प्रक्रिया करणेसाठी मान्यतेस्तव सादर** नव्याने सक्षम प्राधिका-यांचे शिफारस मिळालेल्या वाहनांच्या निर्लेखनास मान्यता देणे. **प्रपत्र क्र. ब**

**खालील प्रपत्र क्र. ब मधील नमुद ४ वाहनांना सक्षम प्राधिकारी यांचे शिफारस मिळाल्यामुळे सदरची वाहने निर्लेखन करण्यास मान्यता घेणेबाबतचा निर्णय लिलावसमिती मार्फत घेण्यात आला आहे.**

| अ क्र | यंत्र सामुग्री / मोटार वाहन | वाहनांचा क्रमांक /तपशिल | नोंदणी धारकाचे नांव | सद्यस्थिती | सक्षम अधिकारी | सुधारित वाजवी किंमत रुपये | लिलाव समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | **महिंद्रा अँड महिंद्रा डिझेल जीप बोलेरो** | **एम. एच. १६ एन ०४५८** | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अहिल्या नगर | वारंवार नादुरुस्त. शासन निर्णय क्र. क्रं.वि. अ.प्र.-२०१३/प्र.क्र.३० /२०१३/ विनियम भाग-२/मंत्रालय, मुंबई दि. ०१ एप्रिल २०१५ मधील अ.क्र.५७ पुस्तिकेतील अ.क्र.१६-क/नियम क्र.६९ पान क्र. ४०-४१ नुसार शासकीय वाहनाची धावसंख्या २.४० लक्ष व आयुर्मान १० वर्षे पुर्ण झालेने वाहन निर्लेखनास पात्र | मा. विभागीय आयुक्त, नाशिक क्र. विआशा/ आस्था-४/ ४९१७३२५/२०२५ दि.२७/०५/२०२५ | १०८०००/- | लिलावास मान्यता |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | महिंद्रा अँड महिंद्रा डिझेल जीप बोलेरो | एम. एच. १६ एन ०५७८ | | | मा. विभागीय आयुक्त, नाशिक क्र. विआशा/ आस्था-४/ ४९१६९३५/२०२५ दि.२६/०६/२०२५ | १७००००/- | |
| ३ | महिंद्रा अँड महिंद्रा डिझेल जीप बोलेरो | एम. एच. १६ एन ०५८१ | | | मा. विभागीय आयुक्त, नाशिक क्र. विआशा/ आस्था-४/ ४८६७५६३/२०२५ दि.२६/०६/२०२५ | १७००००/- | |
| ४ | टोयोटा इटीऑस कार | एम. एच. १६ एन ०५९६ | | | मा. विभागीय आयुक्त, नाशिक क्र. विआशा/ आस्था-४/ ४८६७३८९/२०२५ दि.२७/०५/२०२५ | १७००००/- | |

वर नमूद तक्ता प्रपत्र क्रमांक ब मध्ये सक्षम प्राधिकारी यांची शिफारस मिळालेल्या नमुद वाहनांची ई टेंडर ऑनलाईन निविदेद्वारे निर्लेखन करणेसाठी मा. प्रशासक यांचेसमोर मान्यतेस्तव सादर.

लिलाव प्रक्रिया राबवितांना जास्तीत जास्त प्रसिध्दी देऊन लिलाव साहित्यास निर्धारित वाजवी किंमतीपेक्षा जास्त किंमत मिळणेबाबत विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने ई - निविदा (ऑनलाईन टेंडर पध्दतीने ) निविदा प्रसिध्दी देऊन वाजवी किंमतीपेक्षा जास्त किंमत येईल अशा पध्दतीने अटी शर्तीसह तात्काळ ई - निविदा प्रसिध्द करणेबाबत मा. अध्यक्ष, लिलावसमिती, तथा मु.का.अ.जि.प.अ.नगर यांनी सुचना दिल्या त्याचप्रमाणे शासनाचे ई - निविदा (ऑनलाईन टेंडर पध्दतीने ) पुढील लिलाव प्रक्रिया राबविणेची कार्यवाही लवकरात लवकर करण्याचेही प्रस्तावित केले आहे.

नियमातील तरतुदी :-

१. शासन निर्णय क्रमांक जेईपी-१०८९ / प्र.क्र.१२८ / ९९ / ०५ दिनांक ९ जुलै २००० अन्वये जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांना विकास कामासाठी त्वरीत वाहने उपलब्ध व्हावीत यासाठी जिल्हा परिषदेकडील पदाधिकारी / अधिकारी / पंचायत समितीकडील वाहने निर्लेखीत करुन नविन वाहने मंजुर करण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांना प्रदान करण्यात आले आहेत.

२. शासन निर्णय क्रमांक जेइपी १०९०/सी.आर ४५१८/२६ ग्रामिण विकास विभाग मंत्रालय, मुंबई दि.२३ नोव्हेंबर १९९० व शासन निर्णय क्र.जेईपी १०९६ /सी.आर३५८८/२६ दिनांक २२ नोव्हेंबर २००० ग्रामविकास व जलसंधारण विभागानुसार जिल्हा परिषदेकडील यंत्रसामुग्री / वाहन व इतर साहित्याच्या लिलावासाठी जरी याद्वारे अधिकृत लिलावदाराची नेमणूक करण्यात आलेली असली तरीसुध्दा सदर साहित्याची इतर लिलावादारा मार्फत किंवा इतर मार्गाने सोईस्कर विक्री करण्याचा अधिकार संबंधीत जिल्हा परिषदेस असलेने लिलाव प्रक्रिया राबवितांना जास्तीत जास्त प्रसिध्दी देऊन लिलाव साहित्यास निर्धारित वाजवी किंमतीपेक्षा जास्त किंमत मिळणेबाबत विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने ई - टेंडरद्वारे (ऑनलाईन टेंडर पध्दतीने ) निविदा प्रसिध्दी देऊन याबाबतचे दर मागवून वाजवी किंमतीपेक्षा जास्त किंमत येईल अशा पध्दतीने अटी शर्तीसह तात्काळ ई - निविदा प्रक्रिया करुन विक्री करणेबाबतचे सर्व अधिकार मा. जिल्हा परिषद स्थायी समिती यांची मान्यता घेणे क्रमप्राप्त आहे परंतु स्थायी समितीचे सर्व अधिकार उप सचिव, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, यांचेकडील पत्र क्र. झेपीए-२०२२/प्र.क्र.२५/पंरा-१ दिनांक अन्वये असाधारण राजपत्र क्र. २६ दि. ११ मार्च २०२२ नुसार प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली असुन त्याचे अधिकार प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. अहिल्यानगर यांना दिलेले आहेत.

३. महाराष्ट्र शासन गृह विभाग (परिवहन), शासन निर्णय क्र. एम.व्ही.आर - ०५२२/ प्र.क्र. ४१/ परि-२/ मंत्रालय, मुंबई दि. १४ नोव्हेंबर २०२४ व नुसार वाहने नोंदणी दिनांका पासून सदर शासन निर्णयाच्या दिनांका पर्यंत १५ वर्षे किंवा १५ वर्षांपेक्षा जास्त वय असणारी राज्य शासनाच्या मालकीची वाहने एम.एस.टी.सी मार्फत

निष्कासित (स्क्रॅप) करणे आवश्यक आहे. असे कळवले आहे. आणि त्या त्या विभागातील उपपरिवहन अधिकारी यांना सुचीत करुन ज्या ज्या शासकीय विभागातील वाहनांचे आयुर्मान १५ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वय झाले आहे ते तात्काळ निष्कासीत करावे तसेच अप्पर परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र क्र. एमव्हीआर-१११८/सीआर-४६४ ए / का.२ (३)/ जा.क्र. ५६९२/ दि. १४ मे २०२४ नुसार १५ वर्षे पुर्ण झालेली (वाहनाचे आयुर्मान संपलेलेली / नोंदणी कार्यकाळ संपलेली) शासकीय वाहने इथुन पुढे वापरता येणार नाही. अशी वाहने रस्त्यावर दिसल्यास त्यावाहनांवर तसेच नोंदणीकृत प्राधिका-यांवर कारवाई करण्यात येणार आहे. अशी सर्व वाहने तात्काळ परिवहन आयुक्त (महाराष्ट्र राज्य) यांचे मान्यतेने मेटल स्क्रॅप ट्रेड कॉर्पोरेशन (एम.एस.टी.सी.) मुंबई यांच्याकडून सेलर लॉगीन आय.डी. प्राप्त करुन आपल्या स्तरावरुन एम.एस.टी.सी. यांच्या संकेतस्थळावर तात्काळ निष्कासीत करावयाचे आहे.

त्यानुसार १५ वर्षाच्या आतील वाहने ई निविदेद्वारे (ऑनलाईन टेंडर पध्दतीने प्रसिध्दी देऊन निकाली काढावयाचे व १५ वर्षे पुर्ण झालेली वाहने एम.एस.टी.सी. (धातू भंगार व्यापार महामंडळ) यांच्या मार्फत निष्कासन करण्याबाबत मा. अध्यक्षांनी तात्काळ कारवाई करण्याच्या सुचना दिल्या. त्याचप्रमाणे पुढील लिलाव प्रक्रिया राबविणेची कार्यवाही लवकरात लवकर करण्याचेही प्रस्तावित केले आहे.

**ठराव क्रमांक १६६–** जिल्हा परिषद अधिनिस्त असलेली निरुपयोगी मोटार वाहने / यंत्र सामुग्रीचे लिलाव समितीने शिफारस / मान्यता तसेच फेरमुल्यांकन केलेल्या निरुपयोगी मोटार वाहने व यंत्र सामुग्री यांच्या ई - निविदेद्वारे निर्लेखनास तक्ता

प्रपत्र क्र. अ व ब मध्ये दिलेल्या दिलेल्या निरुपयोगी मोटार वाहने / यंत्रसामुग्रीच्या निर्लेखनास फेर मुल्यांकनासह या ठरावाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

मेटल स्क्रॅप ट्रेड कार्पोरेशन (एम.एस.टी.सी.) मुंबई यांच्याकडून सेलर लॉगीन आय.डी. प्राप्त करुन घेणे साठी जिल्हा परिषदेचा मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नांवे वाहनांची नोंदणी असल्यामुळे त्यांचे नांवाने सेलर लॉगीन आय.डी. प्राप्त करुन घेणे तसेच पोर्टलवर १५ वर्षे किंवा १५ वर्षापेक्षा जास्त वय असणारी सर्व वाहने एम.एस.टी.सी. पोर्टलवरुन स्क्रॅप म्हणुन निष्कासित करणेबाबतचा निर्णय लिलावसमिती मार्फत घेण्यात आला आहे. त्याला ठरावाद्वारे मान्यता देण्यात येत आहे. श्री शिवाजी बाळासाहेब लोंढे, अहिल्यानगर यांनी लिलावात स्पार १० युनिट, रिग मशीन एम एच १२ एफ ८२८७ (टेंडर आय.डी. ९३१२३०) चे १५ वर्षे पुर्ण झालेने लिलावधारकास वाहन ताब्यात न देता प्रादेशीक परिवहन अधिकारी यांचे

सुचनेनुसार ते वाहन मुळ विभागाकडून एम.एस.टी.सी. पोर्टलवर नोंदवून निकाली काढण्याबाबतचा निर्णय या ठरावाद्वारे घेण्यात आला.

नव्याने प्रस्तावीत झालेली यंत्रसामुग्री सक्षम प्राधिकारी यांचेकडे शिफारस करणेसाठी (प्रपत्र - अ)

| अ क्र | यंत्र सामुग्री / मोटार वाहन | वाहनांचा क्रमांक /तपशिल | नोंदणी धारकाचे नांव | सद्यस्थिती | प्रस्तावित वाजवी किंमत रुपये | सक्षम अधिकारी | लिलाव समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | महिंद्रा अँड महिंद्रा डिझेल जीप बोलेरो | एम. एच. १६ एन ०३५० | मा. का.अ. ग्रापापु, जि.प. अ.नगर | सद्यस्थितीत या वाहनाला १५ वर्षे पुर्ण होऊन वाहनाचा उपप्रादेशीक परिवहन कार्यालयाकडील १५ वर्षाचा कार्यकाळ संपला असुन नोंदणीची मुदत संपलेली आहे.<br>महाराष्ट्र शासन गृह विभाग (परिवहन), शासन निर्णय क्र. एम.व्ही.आर - ०५२२/ प्र.क्र. ४१/ परि-२/ मंत्रालय, मुंबई दि. १४ नोव्हेंबर २०२४ नुसार वाहने नोंदणी दिनांकापासून सदर शासन निर्णयाच्या दिनांका पर्यंत १५ वर्षे किंवा १५ वर्षापेक्षा जास्त वय असणारी राज्य शासनाच्या मालकीची वाहने एम.एस.टी.सी मार्फत निष्कासित (स्क्रॅप) करणे आवश्यक आहे. असे कळवले आहे. | किंमतीचे अधिकार प्रादेशीक परिवहन अधिकारी कार्यालया मार्फत ठरवले जाते. | मा. स्थायी समिती विभाग, जि.प. अहिल्या नगर | सक्षम प्राधिकारी यांची शिफारस घेऊन जाहीर ई § निविदे द्वारे लिलावाची कार्यवाही करणेत यावे |
| २ | **महिंद्रा अँड महिंद्रा डिझेल जीप बोलेरो** | एम. एच. १६ एन ०५७७ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अहिल्या नगर | शासन निर्णय क्र. क्रं.वि.अ.प्र.-२०१३/प्र.क्र.३० /२०१३/ विनियम भाग-२/मंत्रालय, मुंबई दि. १७ एप्रिल २०१५ मधील अ.क्र.५७ पुस्तिकेतील अ.क्र.१६-क/नियम क्र.६९ पान क्र. ४०-४१ नुसार शासकीय वाहनाची धावसंख्या २.४० लक्ष व आयुर्मान १० वर्षे पुर्ण झालेनंतरच वाहन निर्लेखनास पात्र होते त्यानुसार वाहन निर्लेखनास पात्र. | १६५०००/- | मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक | |
| ३ | **महिंद्रा अँड महिंद्रा डिझेल** | एम. एच. १६ एन ०५८२ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. | शासन निर्णय क्र. क्रं.वि.अ.प्र.-२०१३/प्र.क्र.३० /२०१३/ विनियम भाग-२/मंत्रालय, मुंबई दि. १७ एप्रिल २०१५ मधील अ.क्र.५७ पुस्तिकेतील अ.क्र.१६-क/नियम क्र.६९ पान क्र. ४०-४१ नुसार शासकीय वाहनाची | १६५०००/- | मा. विभागीय आयुक्त, नाशिक | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | जीप बोलेरो | | अहिल्या नगर | धावसंख्या २.४० लक्ष व आयुर्मान १० वर्षे पुर्ण झालेनंतरच वाहन निर्लेखनास पात्र होते त्यानुसार वाहन निर्लेखनास पात्र. | | विभाग नाशिक | |
| | | एम. एच. १६ एन ०५८९ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अहिल्या नगर | शासन निर्णय क्र. क्रं.वि.अ.प्र.-२०१३/प्र.क्र.३० /२०१३/ विनियम भाग-२/मंत्रालय, मुंबई दि. १७ एप्रिल २०१५ मधील अ.क्र.५७ पुस्तिकेतील अ.क्र.१६-क/नियम क्र.६९ पान क्र. ४०-४१ नुसार शासकीय वाहनाची धावसंख्या २.४० लक्ष व आयुर्मान १० वर्षे पुर्ण झालेनंतरच वाहन निर्लेखनास पात्र होते त्यानुसार वाहन निर्लेखनास पात्र. | १६५०००/- | मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक | |

नव्याने सक्षम प्राधिका-यांचे शिफारस मिळालेल्या वाहनांच्या निर्लेखनास मान्यता देणे. (प्रपत्र - ब)

| अ क्र | यंत्र सामुग्री / मोटार वाहन | वाहनांचा क्रमांक /तपशिल | नोंदणी धारकाचे नांव | सद्यस्थिती | सक्षम अधिकारी | सुधारित वाजवी किंमत रुपये | लिलाव समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | महिंद्रा अँड महिंद्रा डिझेल जीप बोलेरो | एम. एच. १६ एन ०४५८ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अहिल्या नगर | वारंवार नादुरुस्त. शासन निर्णय क्र. क्रं.वि. अ.प्र.-२०१३/प्र.क्र.३० /२०१३/ विनियम भाग-२/मंत्रालय, मुंबई दि. ०१ एप्रिल २०१५ मधील अ.क्र.५७ पुस्तिकेतील अ.क्र.१६-क/नियम क्र.६९ पान क्र. ४०-४१ नुसार शासकीय वाहनाची धावसंख्या २.४० लक्ष व आयुर्मान १० वर्षे पुर्ण झालेने वाहन निर्लेखनास पात्र | मा. विभागीय आयुक्त, नाशिक क्र. विआशा/ आस्था-४/ ४९१७३२५/२०२५ दि.२७/०५/२०२५ | १०८०००/- | लिलावास मान्यता |
| २ | महिंद्रा अँड महिंद्रा डिझेल जीप बोलेरो | एम. एच. १६ एन ०५७८ | | | मा. विभागीय आयुक्त, नाशिक क्र. विआशा/ आस्था-४/ ४९१६९३५/२०२५ दि.२६/०६/२०२५ | १७००००/- | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | महिंद्रा अँड महिंद्रा डिझेल जीप बोलेरो | एम. एच. १६ एन ०५८१ | | | मा. विभागीय आयुक्त, नाशिक क्र. विआशा/ आस्था-४/ ४८६७५६३/२०२५ दि.२६/०६/२०२५ | १७००००/- | |
| ४ | टोयोटा इटीऑस कार | एम. एच. १६ एन ०५९६ | | | मा. विभागीय आयुक्त, नाशिक क्र. विआशा/ आस्था-४/ ४८६७३८९/२०२५ दि.२७/०५/२०२५ | १७००००/- | |

प्रपत्र क्र. अ व ब मध्ये दिलेल्या दिलेल्या निरुपयोगी मोटार वाहने / यंत्रसामुग्रीच्या निर्लेखनास फेर मुल्यांकनासह या ठरावाद्वारे मान्यता देण्यात येत आहे

**विषय क्रमांक ५**- जिल्हा वार्षिक योजना ( सर्वसाधारण ) 2025-26 प्राथमिक आरोग्य केंद्राना प्रमाणकानुसार ( मंजुर संख्येनुसार ) रुग्णवाहिकांची खरेदी करणे तसेच देखभाल व दुरुस्ती करणे या खर्चास प्रशासकीय मान्यता देणे बाबत

प्रस्तावना :- अहिल्यानगर जिल्हयामध्ये एकुण 102 प्राथमिक आरोग्य केंद्र 05 पथके व 2 भरारी पथके कार्यरत आहेत. त्यापैकी 102 ठिकाणी शासकीय रुग्णवाहिका व मुख्यालय स्तरावर अधिकारी वापरत असलेले 03 व 01 व्हॅक्सीन व्हॅन अशी एकुण 106 वाहने वापरात आहेत.

जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, अहिल्यानगर यंाचेकडील पत्र क्रं. जिवायो/25-26/अर्थसंकल्प तरतुद/संस-2/ --/2025 दिनांक 24.4.2025 अन्वये जिल्हा वार्षिक योजना ( सर्वसाधारण ) सन 2025-2026 अंतर्गत कार्यान्वयीन यंत्रणाना अर्थसंकल्पिय तरतुद कळविणे अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्राना प्रमाणकानुसार ( मंजुर संख्येनुसार ) रुग्णवाहिकांची खरेदी करणे तसेच देखभाल व दुरुस्ती करणे मुख्य लेखाशिर्ष 2210 उपलेखाशिर्ष आय 372 उदिष्ट शिर्ष 31, अर्थ संकल्पित तरतुद रु.50.00 लक्ष कळविण्यात आलेली आहे.

ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्रं.झेडपीए-2016/प्र.क्रं.56/वित्त-9 दि.07 ऑक्टोबर 2017 अन्वये भाग-2 अन्वये विकास योजना यांच्या संबधातील प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले असून मा.स्थायी समिती सभेस न्यूनतम मर्यादा 30,00,001 ते अधिकतम मर्यादा 50,00,000/- प्रदान करण्यात आलेली आहे.

तथापी सध्या प्रशासक कालावधी सुरु असल्याने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,अहमदनगर यांचेकडील आदेश क्रं साप्रवि-1/परिषद/334/2022 दिनांक 2.3.2022 अन्वये प्रशासक कालावधीत जिल्हा परिषद/पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील विविध कामे व योजना अंमलबजावणीसाठी निर्णय घेणे कामी विविध स्तरांवर सल्लागार समित्याची नियुक्ती करणे अंतर्गत स्थायी समिती सभेचे अनुषंगाने सल्लागार समितीची रचना करण्यात आलेली असल्याने प्राथमिक आरोग्य केंद्राना प्रमाणकानुसार ( मंजुर

संख्येनुसार ) रुग्णवाहिकांची खरेदी करणे तसेच देखभाल व दुरुस्ती करणे मुख्य लेखाशिर्ष 2210 उपलेखाशिर्ष आय 372 उदिष्ट शिर्ष 31, अर्थ संकल्पित तरतुद रु.50.00 लक्ष रक्कमेस खालील नमुद केलेल्या बाबीस प्रशासकीय मान्यता देणे.

1. 10 रुग्णवाहिकांसाठी नविन टायर्स खरेदी एकुण नग 40 अंदाजे रक्कम रु.288592/-
2. 17 रुग्णवाहिकांसाठी नविन बॅटरी खरेदी एकुण नग 17 रक्कम रुपये 125324/-
3. रुग्णवाहिका क्रं एम एच 16 डी पी 0385 फोर्स टॅव्हलर या रुग्णवाहिकेच्या अपघाती दुरुस्ती रक्कम रुपये -146675/-
4. फोर्स ट्रॅव्हल रुग्णवाहिका 89 दुरुस्ती व टाटा सुमो रुग्णवाहिका 12 दुरुस्ती (101) रक्कम रुपये 1569825/-
5. प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावरील 101 रुग्णवाहिकांसाठी डिझेल देयकासाठी रक्कम रुपये 2869584/-

नियमातील तरतुदी :- ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्रं.झेडपीए-2016/प्र.क्रं.56/वित्त-9 दि.07 ऑक्टोबर 2017 अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करणे.

विभागाचे अभिप्राय :- प्रस्तावनेमध्ये नमुद केल्यानुसार प्राथमिक आरोग्य केंद्राना प्रमाणकानुसार (मंजुर संख्येनुसार) रुग्णवाहिकांची खरेदी करणे तसेच देखभाल व दुरुस्ती करणे मुख्य लेखाशिर्ष 2210 उपलेखाशिर्ष आय 372 उदिष्ट शिर्ष 31, अर्थ संकल्पित तरतुद रु.50.00 लक्ष रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करणे.

**ठराव क्रमांक १६७ :-** जिल्हा वार्षिक योजना ( सर्वसाधारण ) २०२५-२६,प्राथमिक आरोग्य केंद्राना प्रमाणकानुसार ( मंजुर संख्येनुसार ) रुग्णवाहिकांची खरेदी करणे तसेच देखभाल व दुरुस्ती करणे यासाठी मंजुर तरतुद रक्कम रुपये ५०.०० लक्ष मधुन प्रस्तावनेमध्ये नमुद केलेल्या बाबींवर खर्च करण्यास सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**विषय क्रमांक ६-** ग्रामपंचायत ब्राम्हणगाव ता. कोपरगाव येथे शॉपिंग सेंटर गाळे बांधण्यासाठी जिल्हा ग्रामविकास निधीतून कर्ज मिळणेबाबत. स्थायी सभेत ठेवावयाचा विषय

गट विकास अधिकारी पंचायत समिती कोपरगाव यांचेकडील पत्र क्र.ग्रापं/४७८/२०२५ दिनांक १७/०७/२०२५ अन्वये प्रस्ताव सादर केलेले आहे. सदर प्रस्तावात ग्रामपंचायत ब्राम्हणगाव ता. कोपरगाव येथे शॉपिंग सेंटर गाळे बांधण्यासाठी जिल्हा ग्राम विकास निधीतून कर्ज रु. ५०,००,०००/- ची मागणी केलेली आहे.

ग्रामपंचायत ब्राम्हणगाव ता. कोपरगाव यांची मासिक सभा दिनांक २४/०१/२०२५ ठराव क्र. ८ अन्वये तसेच पंचायत समिती कोपरगाव सर्वसाधारण सभा दिनांक ०७/०७/२०२५ ठराव क्रं. ९२ अन्वये तसेच ग्रामसभा ठराव क्र. ६ दि. १२/०७/२०२५ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ५०,००,०००/- इतके आहे.

ग्रामपंचायत ब्राम्हणगाव ता. कोपरगाव यांची मागील तीन वर्षाच्या आर्थिक स्थितीची तपासणी केली असता व गट विकास अधिकारी पंचायत समिती कोपरगाव यांचे शिफारशीची तपासणी केली असता उत्पन्न व खर्चाचा तपशील अनुसरुन शासन निर्णय व्हीपीए/११५९/पीपीएच/६०दि.२३/०१/१९६० अन्वये अंदाजपत्रकाचे ७५ टक्के रक्कम देता येईल व तसेच शासन निर्णय जिल्हा ग्राम विकास निधी नियम १९६०(१ ली सुधारणा) २००० दिनांक २५/८/२००० नियम ११(३)(ब) अन्वये उत्पन्नाच्या तीन वर्षांच्या सरासरीचे ३० पट (उत्पादक बाबींसाठी) ग्रामपंचायतीचे परत फेडीचे ऐपत लक्षात घेता रक्कम रु. ३७,५०,०००/- इतके रक्कम कर्ज खालील अटी व शर्तीवर देता येईल.

१. ज्या कामासाठी कर्ज दिलेले आहे त्या कामासाठी वापर करणेत यावे.
२. कर्जाची परत फेड १० वर्षांत परतफेड करण्यात यावे.
३. सदर कर्जावर व्याज प्रति वर्ष ५ टक्के व दिलेल्या मुदतीत न भरल्यास दंडात्मक व्याज २.५ टक्के अकारण्यात येईल.
४. बांधकाम स्वत:च्या मालकी हक्काचे जागेवरचं करण्यात यावे.
   ग्रामपंचायतीकडील विहीत जागेवर बांधकाम करावयाचे असल्यास सक्षम प्राधिकारी / प्राधिकरण यांचे मान्यता घेवून बांधकाम सुरु करावे.
५. बांधकाम सुरु करण्यापुर्वी सक्षम प्राधिकारी / प्राधिकरण (उदा.रस्ते, वीज) यांचा नाहरकत दाखला घ्यावा.

नियमातील तरतुदी -

१. मुंबई जिल्हा ग्रामविकास निधी नियम विपीए/११५९/पीपीएच/६० दिनांक २३/१/१९६० अनुसार ७५ टक्के रक्कम देता येईल.
२. मुंबई जिल्हा ग्रामविकास निधी (१ली सुधारणा) २००० दि.२५/८/२००० नियम ११(३)(ब) अन्वये.
३. मुंबई जिल्हा ग्रामविकास निधी (१ली सुधारणा) २००० दि.२५/८/२००० नियम ११(२) (क) व (ड)

**ठराव क्रमांक १६८ :-** ग्रामपंचायत ब्राम्हणगाव ता. कोपरगाव येथे शॉपिंग सेंटर गाळे बांधण्यासाठी जिल्हा ग्रामविकास निधीतून कर्ज रु. ५०,००,०००/- ची मागणी केलेली आहे. शासन निर्णय व्हीपीए/११५९/पीपीएच/६०दि. २३/०१/१९६० अन्वये अंदाजपत्रकाचे ७५ टक्के रक्कम देता येईल व तसेच शासन निर्णय जिल्हा ग्राम विकास निधी नियम १९६०(१ ली सुधारणा) २००० दिनांक २५/८/२००० नियम ११(३)(ब) अन्वये उत्पन्नाच्या तीन वर्षांच्या सरासरीचे ३० पट (उत्पादक बाबींसाठी) ग्रामपंचायतीचे परत फेडीचे ऐपत लक्षात घेता रक्कम रु. ३७,५०,०००/- इतके रक्कम कर्ज खालील अटी व शर्तीवर देता येईल.

१. ज्या कामासाठी कर्ज दिलेले आहे त्या कामासाठी वापर करणेत यावे.
२. कर्जाची परत फेड १० वर्षांत परतफेड करण्यात यावे.
३. सदर कर्जावर व्याज प्रति वर्ष ५ टक्के व दिलेल्या मुदतीत न भरल्यास दंडात्मक व्याज २.५ टक्के आकारण्यात येईल.
४. बांधकाम स्वत:च्या मालकी हक्काचे जागेवरचं करण्यात यावे.
ग्रामपंचायतीकडील विहीत जागेवर बांधकाम करावयाचे असल्यास सक्षम प्राधिकारी / प्राधिकरण यांचे मान्यता घेवून बांधकाम सुरु करावे.
५. बांधकाम सुरु करण्यापुर्वी सक्षम प्राधिकारी / प्राधिकरण (उदा.रस्ते, वीज) यांचा नाहरकत दाखला घ्यावा.

सचिव तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(सा.)
जिल्हा परिषद, अहिल्यानगर

प्रशासक तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर